**रजिष्टर पोस्टाने**

जा.क्र.जिपऔ/1-प्रशासन/कावि/2019/28
कार्यालय जिल्हा परिषद,औरंगाबाद
दिनांक 04/01/2019

प्रति,

**श्री/श्रीमती** अनुकंपा प्रतिक्षा सुची अंतिम 2018
अ.क्र. 1,9,11,17,24,38,39
तसेच अ.क्र. 41 ते 50 उमेदवार.

**विषय- अनुकंपातत्वावर नियुक्तीसाठी मुळ कागदपत्र तपासणी बाबत.**

संदर्भ- 1) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 23 ऑगस्ट 1996
2) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 21 सप्टेंबर 2017
3) शासन पत्र सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 06 डिसेंबर 2018
4) शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग मंत्रालय मुंबई दिनांक 07 डिसेंबर 2018
5) अनुकंपा प्रतिक्षा सुची अंतिम दिनांक 29 डिसेंबर 2018

उपरोक्त विषयी सुचीत करण्यात येते की, जिल्हा परिषद औरंगाबाद अंतर्गत संदर्भ क्र. 5 अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुकंपा सर्वसाधारण सेवाजेष्ठता यादीतील पात्र उमेदवारांना त्यांचे शैक्षणीक अर्हता व प्रवर्गानुसार गट-क व गट-ड मधील रिक्त पदांवर पदस्थापना देण्याचे प्रस्तावित आहे.

सेवाजेष्ठता यादीतील उमेदवारांना त्यांचे अनुक्रमानुसार नियूक्ती देण्याच्या अनुषंगाने आवश्यक बाबीची त्यांच्या मुळ कागदपत्रावरुन तपासणी करणे आवश्यक आहे. या करीता दिनांक 05/01/2019 रोजी यशवंतराव चव्हाण, सभागृह जिल्हा परिषद, औरंगाबाद येथे सकाळी 11.00 वाजेपासुन कागदपत्राची तपासणी केली जाणार आहे.

तरी आपले शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग, गटविकास अधिकारी यांचा गृहभेट अहवाल इत्यादी तसेच मुळ कागदपत्रासह व एक छायांकित झेरॉक्स प्रतिसह वर नमुद ठिकाणी उपस्थित रहावे.

स्वाक्षरीत/-

(शिरीष बनसोडे)
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**प्रतिलिपी-**

गटविकास अधिकारी, पंचायत समिती. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . यांना सोबत तपासणी सुची देण्यात येत असुन आपल्या तालुक्या अंतर्गत संबधिताचे प्रत्यक्ष गृहभेट घेवून अहवाल 3 दिवसाच्या आत गोपनिय रित्या सामान्य प्रशासन विभाग, जि.प.औरंगाबाद येथे प्रत्यक्ष देण्यात यावा. सदर प्रकरणात दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी.

स्वाक्षरीत/-
(शिरीष बनसोडे)
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
जिल्हा परिषद, औरंगाबाद